पोलीस आयुक्त,ठाणे शहर अंर्तगत

निजामपुरा पोलीस स्टेशन,भिवंडी जि.ठाणे

Email ID- cp.thane.nizampura@mahapolice.gov.in

दुरध्वनी क्रमांक फोन ०२५२२-२५०२५०

दिनांक - २२/१२/२०२५

प्रेस नोट

अंमली पदार्थ गांजा मानवी आरोग्यास अपायकारक असल्याचे माहीत असुनही स्वत:च्या आर्थिक फायद्याकरीता विक्री करीता जवळ बाळगला म्हणुन गुन्हेगार अतिक जुमन शेख,यास निजामपुरा पोलीसाकडुन अटक

निजामपुरा पोलीस स्टेशन परिसरांमध्ये गुन्हेगार वॉच, अवैध धंदे, चोरीच्या घटना, गंभीर गुन्हयांना प्रतिबंध व्हावा व गुन्हे करणारे गुन्हेगांराना वेळीच जेरबंद करण्याबाबत मा. पोलीस उप आयुक्त श्री. शशिकांत बोराडे, सो., परिमंडळ-२ भिवंडी व मा. सहा.पोलीस आयुक्त श्री. डॉ. विजय मराठे सो., पश्चिम विभाग भिवंडी यांनी परिमंडळातील प्रत्येक पोलीस ठाणेतील अधिकारी व अंमलदार यांना आपआपले पोलीस ठाणे हद्दीत सतर्क राहण्याबाबतचे आदेश दिलेले आहे. त्यानुसार निजामपुरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास डगळे व पोलीस निरीक्षक समाधान पाटील (गुन्हे) यांच्या सुचना व व मार्गदर्शनाखाली सदर कारवाई केली आहे.

निजामपुरा पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी पोउपनि/जीवन म्हस्के, तसेच अंमलदार पोहवा/५०७७ कांबळे, पोना/२९३६ कोदे, पोशि/१९६३ सांबरे, पोशि/३९१२ कोळी, पोशि/७९९९ पवार हे पोलीस ठाणे हददीत गस्त करत असतांना पोशि/७९९९ प्रतिक पवार यांना गुप्त बातमीदाराकडून '' निजामपूरा पोलीस ठाणे हददीत अहमदनगर रोड, गुजराती चाळ, खाडीपार भिवंडी येथे एक इसम गांजा विक्रीसाठी घेवुन येणार आहे.'' अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो, विश्वास डगळे, पोउपनिरी/जीवन म्हस्के, तपास पथकाचे अंमलदार पोना/२९३६ अशोक कोदे, पोशि/७९९९ पवार, पोशि/१९६३ सांबरे, पोशि/१३५० वनवे, पोशि/२२०६३ टकले असे सदर ठिकाणी सापळा लावुन थांबुन राहीलो असता तेथे आरोपी नामे अतिक जुमन शेख, वय ३० वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. अहमद नगर रोड, टिएमची बिल्डींग, दुसरा माळा, खाडीपार, भिवंडी, हा मिळुन आला त्याच्या अंगझडतीमध्ये १,१२,०००/- रू. किमंतीचा ०५ किलो १११ ग्रॅम वजानाचा राखाडी रंगाची गोणीमध्ये हिरव्या रंगाची सुकलेली पाने, फळे, फुले, बिया सलग्न असलेले कॅनाबिस वनस्पतीचे शेंडे असलेला गांजा मिळुन आला

सदर यशस्वी कामगिरी मा.पोलीस आयुक्त,ठाणे शहर श्री.आशुतोष डुंबरे सो., मा. पोलीस उप आयुक्त श्री.शशिकांत बोराडे, सो., परिमंडळ-२ भिवंडी व मा. सहा.पोलीस आयुक्त श्री. डॉ. विजय मराठे सो.,पश्चिम विभाग भिवंडी मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो, विश्वास डगळे सो, मा.पोनि. समाधान पाटील (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाने व निजामपुरा पोलीस ठाण्याचे तपास पथकाचे पोउपनिरी/म्हस्के, तसेच अंमलदार पोहवा/५०७७ कांबळे, पोना/२९३६ कोदे, पोशि/१९६३ सांबरे, पोशि/३९१२ कोळी, पोशि/७९९९ पवार यांनी केलेली आहे.


महाराष्ट्र पोलीस
अंतर्गत
निजामपुरा पोलीस ठाणे (भिवंडी)
दूरध्वनी क्रमांक:- 02522-250250
महाराष्ट्र पोलीस
पहिला मजला